# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०९/०१/२०२२ (रविवार)


---

### —: घरफोडी :—

पो.स्टे. केळवद :— अंतर्गत १२ किमी अंतरावरील मौजा उमरी येथे श्रिकांत गजानन धांडे वय ४५ वर्श रा. उमरी ह.मु. सावनेर नाईक लेआॅउट यांची बस स्टॉप येथे भवानी ईलेक्ट्रीकल वर्क दुकान असून दिनांक ०७/०१/२०२१ चे रात्री दरम्यान कोणितरी अज्ञात इसमांनी दुकानाचे लोखंडी शटर एका बाजुचे कुलूप तोडुन त्याच बाजुने शटर वर करून आत प्रवेश करूण दुकानातील १) ३ कोर कॉपर १०० मिटर केबल १५,००० /रू २) नविन कॉपर वायर १५,०००/रू एकुण कि. ३०,०००/रू चा माल चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी श्रिकांत गजानन धांडे वय ४५ वर्श रा. उमरी ह.मु. सावनेर नाईक लेआॅउट तह. सावनेर मो.न. ९९२१७०४१०८ यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. केळवद येथे अप क्रमांक ०६/२०२२ कलम ४५७,३८० भादवी अन्वये गुन्हा नोंद केला असून आरोपींचा शोध घेणे सुरु आहे. पुढील तपास सफौ ज्ञानेश्वर औझे मो.नं. ९५१८९९६६८७ हे करित आहेत.

### —: चोरी (मोटार सायकल) :—

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत ५ किमी अंतरावरील खरडा पुनर्वसन मारोडर येथील निवासी सचिन ऋषी रेवतकर यांनी दिनांक ०६/०१/२०२२ चे रात्री दरम्यान आपली एमएच ४० एस ५४६१ मोटार सायकल आपल्या राहत्या घराचे अंगनात ठेवली होती. कोणीतरी अज्ञात इसमांनी सदर मोटार सायकल चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी सचिन ऋषी रेवतकर वय ३० वर्ष रा खरडा पुनर्वसन मारोडी ता मौदा जि नागपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात विरुध्द पो.स्टे. मौदा येथे अप क्रमांक १२/२०२२ कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोहवा प्रशांत काळे मो. क्र. ९८२२५ ४९६९५ हे करित आहे

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत ८ किमी अंतरावरील वलनी येथील डब्ल्यु.सी.एल. रुग्णालय समोर संतोष बाळकृष्णा पाटील यांनी आपली क्र एम एच ४० एव्ही २३९७ होन्डा शााईन ग्रे रंगाची मोटार सायकल ठेवुन आपले ऑफिस मध्ये गेले व दुपारी १/३० वा चे सुमारास बाहेर आले असता त्यांना त्यांची मोटार सायकल ठेवलेल्या जागेवर दिसली नाही, त्यांनी आजुबाजुला शोध घेतला असता मिळुन आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमांनी ती चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी संतोष बाळकृष्णा पाटील वय ४६ वर्ष रा डब्लु सीएल कालोनी वार्ड क्र ०४ वलनी क्वाटर न ६९९ यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात विरुध्द पो.स्टे. खापरखेडा येथे अप क्रमांक १५/२०२२ कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास एएसआय धांडे मो.क्र. ९७६४४०१२४६ हे करित आहे

### —: विश्वासघात :—

पो.स्टे. बोरी :— अंतर्गत १० किमी अंतरावरील बोरखेडी येथील रहवासी श्री. सिध्दार्थ रामराम गोंडाने वय ६२ रा.वार्ड नं. ३ बोरखेडी रेल्वे मो.क्रं. ७७४१९४९०४१ हे रेल्वेत नोंकरीवर होते आणी सेवानिवृत्त झाले असून त्यांचे सेवानिवृत्त वेळी त्यांचे बॅक खातेमध्ये एकुण २२,००,०००/— त्यामधुन त्यांनी रुपये १५,००,०००/— ची एफ.डी. केलेली होती व बाकीचे रुपये ७,००,००० रु. त्यांचे खात्यात होते. सन २०२१ चे एप्रिल महिण्यात त्यांचा खांदयाचे ऑपरेशन झाल्याने ते सप्टेंबर महिण्यापर्यंत रुग्णालयात होते. रुग्णालयात असतांना त्यांचे पासबुक व इतर कागदपत्रे त्यांचे राहते घरी होते. काही दिवसापुर्वी त्यांनी बॅकेत जावून आपली पासबुक प्रिंट केले असता त्यांना त्यांचे खात्यात फक्त रु.२६,९१२/ असल्याचे समजले व सदरची रक्कम ही १) शशीकला सिध्दार्थ गोंडाणे रा.वार्ड नं. ३ बोरखेडी रेल्वे, २) टोनी थामस जोसेफ,३) मिना सुधाकर घोसे यांचे खात्यात ट्रान्सफर झाल्याचे समजले.

सदर प्रकरणी फिर्यादी श्री. सिध्दार्थ रामराम गोंडाने वय ६२ रा.वार्ड नं. ३ बोरखेडी रेल्वे मो.क्रं. ७७४१९४९०४१ यांचे बयाणा रिपोर्ट वरुन आरोपी १) शशीकला सिध्दार्थ गोंडाणे रा.वार्ड नं. ३ बोरखेडी रेल्वे, २) टोनी थामस जोसेफ,३) मिना सुधाकर घोसे विरुध्द पो.स्टे. बोरी येथे अप क्रमांक १४/२१ कलम ३८०, १२० (सी) ४६७, ४६८, ४७१, ३८४ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोउपनि मोरखेडे मो.क्र. ८२०८७५१२४९ हे करित आहेत.

—: अपघातात मृत्यु :—

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत ५ किमी अंतरावरील असलेले नवेगाव साधु शिवारा दिनांक ०७/०१/२२ चे १८/३० ते १८/४५ वा. दरम्यान रत्यावरुन सायकल ने जाणारे गजाजन राजराम नारनवरे वय २२ आणि राजराम लाहनुजी नारनवरे वय ५२ नवेगााव साधु याना अज्ञात चारचाकी वाहनाचे चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन धडक मारून पळून गेला. सदर अपघातात राजराम लाहनुजी नारनवरे वय ५२ यांचे मरण पावले आणि गजाजन राजराम नारनवरे वय २२ हे गंभीर जख्मी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी पोहवा/रामेश्वर रावते ब न १२११ पो स्टे उमरेड यांचे चौकशी रिपोर्ट वरुन अज्ञात वाहन चालकाविरुध्द पो.स्टे. उमरेड येथे अप क्रमांक १४/२१ कलम १५/२०२२ कलम २७९ ३०४ (अ) भादवी सहकलम १३४ १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोहवा रामेश्वर रावते मो.क्र.९४२०४०९४५४ हे करित आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर